Research Article

# खेड्यांची पुनर्रचना आणि गांधीजींचे विचार

**प्रा. बालाजी गंगावणे**

विभाग प्रमुख, इतिहास , माऊली महाविद्यालय, वडाळा, ता. उ. सोलापूर जि. सोलापूर.

**प्रस्तावना -**

आज भारताने क्षेत्रामध्ये दैदीप्यमान प्रगती केली आहे. माणसाने येथील निसर्गाचा स्वतःच्या स्वार्थासाठी मोठ्या प्रमाणात वापर केला आहे. त्यामुळे निसर्गाची मोठ्या प्रमाणात हानी झाली आहे. आणि त्यामंळे निसर्गाचे संतुलन बिघडले आहे. त्यामुळे आज मानवाला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. माणसाने यंत्रे निर्माण केली परंतु त्यातून अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. ध्वनी प्रदूषण, हवा प्रदुषण जल प्रदुषण याचे दुष्परिणाम मानवाच्या रोगावर होत आहे. मोठी शहरे निर्माण झाली परंतु शहरातील लोकांच्या जीवनातून शांती लुप्त झाली आहे. माणसे आज हवालदिल झाले आहेत. या सर्व माणसांना आज गांधीजींच्या विचारांची अतिशय गरज आहे. गांधीजीनी आपल्या विचारातून निसर्ग, संतुलन, आरोग्यपुर्ण जीवन, साधे राहणे, गावांचे आरोग्य, रोगांवर उपचार, शुध्द आहार ग्राम स्वराज्य, गाईगुरांची जोपासना, ग्रामीण अर्थव्यवस्था या सर्वावर अतिशय अभ्यासपुर्ण विवेचन केले आहे. गांधीजीने आपले सर्व विचार अहिंसक मार्गाने मांडले आहेत.

गांधीजीनी गावातील विविध विषयाची व प्रश्नाची इतकी तपशिलवार व उद्‌बोधक मीमांसा केली आहे. त्याबद्दल निराळे भाष्य करण्याची जरुरी नाही. आज विज्ञानाने भरपूर प्रगती केली आहे. अशा वेळी गांधीजीच्या विचारांची गरज निर्माण झाली आहे. विज्ञान विश्वाला एकत्र आणुन भौगोलिक कुटुंब बनवित आहे. मानव मात्र विज्ञान भोगाच्या नादात आपले कुटुंब उध्वस्त करुन राहिला आहे. म्हणून ग्राम कुटुंबाची भावना बध्दमूल झाल्याशिवाय विश्वकुटुंब ही कल्पनाच करता येणार नाही.

**आदर्श खेडे -**

महात्मा गांधीनी आदर्श खेडेगाव कसे असावे यासंदर्भात अतिशय चांगले विचार मांडले आहेत. खेड्यामध्ये स्वच्छता असणे हे गरजेचे आहे. घराची रचना करीत असताना घरामध्ये भरपूर शुध्द हवा आणि प्रकाश यायला पाहिजे. घर बांधत असताना घराच्या पुढे आणि पाठीमागे मोकळी जागा सोडणे गरजेचे आहे. कारण त्या मोकळ्या जागेमध्ये घरासाठी लागणारा भाजीपाला लावता येईल, तसेच जनावरे बांधण्यासाठी ही जागा वापरता येईल. गावातील लोकांना पिण्याच्या पाण्यासाठी सभाग्रह असेल, गावाची गुरे चारण्याकरिता एक सामाईक कुरण असेल. सहकारी दुध पुरवठा केंद्र असेल, प्राथमिक व माध्यमिक शाळा असतील तसेच तेथे औद्यागिक शिक्षणाला मध्यवर्तीक स्थान असेल, तसेच गावात गावची पंचायत असेल व त्यात तंटे मिटविले जातील, गावातील लोकांना लागणारा भाजीपाला, फळे आणि धान्य यांचे उत्पादन गावच करेल. अशी आदर्श गावाबद्दलची गांधीजींची कल्पना होती. गावची सुधारणा करण्यासाठी लोकांमध्ये एकमेकात सहकार्य असणे जरुरी आहे. खेड्यात निर्माण होणा-या वस्तु बाजारात विकण्यासाठी असणार नाहीत. त्या फक्त गावासाठी असतील.

गावातील माणसांना शुध्द हवा आरोग्य संपन्न ताजे गाईचे दुध, गाईंना ताजे गवत, माणसांना ताजा भाजीपाला तसेच फळे मिळाले पाहिजे. यातील काही वस्तु आपण जर शहरातून आणलो तर आपण कुठेतरी कमी पडलो असे समजावे. या सर्व सुधारणा एकदम घडून येतील असे नाही हे गांधीना माहित होते. म्हणून ते म्हणत कार्यकर्त्यांनी दृढ निश्चय करुन काम केले पाहिजे.

खेड्याची पुनर्रचना ही कायमस्वरुपी व्हावी हस्तोद्योग, कला, आरोग्य, शिक्षण या सर्वांना एकत्र करुन सुधारणा व्हावी. खेड्यात सुधारणा झाल्यावर गावात ग्रामीण कवी, ग्रामीण कलावंत , ग्रामीण कोवीद आणि संशोधक तयार होतील. खेडी म्हणजे उकीरड्यांचे ढिगारे आहेत हीच खेडी चिमुकली नंदनवने होतील तेथे श्रेष्ठ दर्जाचे लोक राहतील. अशा लोकांना कोणीही फसवणार नाही. हिंदूस्तान हा शहरांचा नसून खेड्याचा आहे. ग्रामीण जीवनातून गेलेला हस्तोद्योग सुरु करणे गरजेचे आहे. हस्तोद्योग सुरु केल्यामुळे ते शहरावर अवलंबून राहणार नाहीत.

**गावचे आरोग्य -**

महात्मा गांधीनी ग्रामीण सफाईवर अधिक भर दिल्याचे दिसून येते. गावची स्वच्छता ही गावची खरे पुरुषार्थ आहे. आमची खेडी म्हणजे घाणीचे माहेरघर बनले आहे. त्यामुळे खेड्यात बालमृत्यु आणि अपमृत्यु होतात. माणसांना जे आजार जडतात. ते अस्वच्छतेमुळे. त्यामुळे आरोग्यकारी सवई असणे गरजेचे आहे. आरोग्याकडे लक्ष दिल्यामुळे शरीर संपदा प्राप्त होईल. संपत्तीत वाढ होईल कार्यशक्तीत वाढ होईल. आपण आपल्या कुटुंबाच्या स्वच्छतेचा विचार करतो. पण सार्वजनिक स्वच्छतेचा विचार करत नाही. आपण आपले रस्ते आणि सडका घाण टाकून अस्वच्छ करतो तसेच गावच्या विहीरीत तळ्यामध्ये पण घाण टाकतो. त्यामुळे त्याचे दुष्परिणाम आपणाला भोगावे लागतात. त्यासाठी गावच्या आरोग्यासाठी गावची सार्वजनिक स्वच्छता ठेवणे गरजेचे आहे. वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छतेकडे लक्ष पुरवणे गरजेचे आहे. हे सर्व काम कार्यकर्त्यांनी करावयाचे आहे. आणि त्यानंतर गावचा समावेश असेल.

गावामध्ये मिळणारा जो कचरा असतो तो एकत्र करावा त्या कच-याचे भाग करुन त्यापासून खत बनवता येतो. हा खत सर्वोत्कृष्ठ असणार आहे. आज अनेक ठिकाणी रस्त्यावर केर-कचरा टाकला जातो. त्यामुळे रस्ते घाण होतात. परंतु महात्मा गांधीनी याच कच-यापासून लाखे रुपये किमतीचे खत निर्माण करण्याच्या संदर्भात सांगितले आहे.

गावातील तळे आंघोळीकरता कपडे धुण्यासाठी, पिण्यासाठी या कामासाठी पाणी वापरतात. अनेकदा या तळ्यात गाई व म्हशी लोळतात. त्यामुळे हे पाणी पिण्यायोग्य राहत नाही. असे पाणी पिल्यामुळे अनेक आजार जडतात. त्यामुळे अशा पाण्यामध्ये गुरे जाऊ देऊ नये.

निसर्ग हा सर्वोत्कृष्ट वैद्य आहे. हे आपण लक्षात ठेवाव. माणसाने जे बिघडविले ते दुरुस्त करण्याचे काम निसर्ग करत असतो. ते पण संतुलित ठेवले म्हणून निसर्ग संतुलन ठेवणे गरजेचे आहे.

**गुरांची व गायीची जोपासना -**

महात्मा गांधीनी गायीची जोपासना करण्याच्या संदर्भात विवेचन केले आहे. आज जगात मोठ्या प्रमाणावर गायीची कत्तल केली जात आहे. गाय आज नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. युरोपप्रमाणे गायी पाळणे दुधासाठी आणि मौसासाठी पण आपली संस्कृती अहिंसेवर आधारित आहे. अनेकदा शेतकरी गाईंना उपाशी ठेवतो. कारण आमच्या दारिद्रयाचा प्रश्न आहे. पण ऋषीमुनी सांगतात की, गायीचे रक्षण करा सर्वांचे रक्षण होईल. गुरे पाळत असताना सांगतात की, सामुदायिक पालनाची पध्दत योग्य आहे. कारण शेतक-याला वैयक्तिकरीत्या गुरांची पालनपोषण करणे अवघड जाते. सामुदायिक पध्दतीने जनावरे पाळली तर ते घराजवळ घाण करणार नाहीत. तेथील हवापण दुषित होण्याची भिती राहत नाही. त्यामुळे एकुणच जनावरांच्या संख्येत वाढ होऊ शकते. गुरे आजारी पडली तर त्यांना उपचार करणे सामुदायिक पध्दतीने शक्य होते. तसेच सामुदायिक गुरे पालन पध्दतीमुळे अनेक गाईकरता एकच वळू ठेवणे शक्य होते. सामुदायिक पध्दतीत सामाई कुरण ठेवून त्यावर गुरे चारणे सोयीस्कर जाते सामुदायि पध्दतीत दुधाची विक्रीपण सहकारी तत्त्वावर करण्यात येते.

गाई आणि म्हशीचे रक्षण केले तर आपल्याला दुध आणि तुप भरपुर प्रमाणात मिळेल ते पण शुध्द. जनावरापासून शेतीकामासाठी लागणारे जनावरे, गाय मेलीतर ती अतिशय उपयोगी ठरते तिच्या हाडाचास, कातड्याचा उपयोग करुन घेतला पाहिजे. गांधी म्हणतात की, खाटकाला आपण दोष देऊन मोकळा होतो पण त्याला दोष देण्यापेक्षा गाईचे खाटकाला विकायचे नाहीत. त्यामुळै गाईचे रक्षण होईल, गाईचे रक्षण केले नाहीतर शेतक-यांपुढे अनेक प्रश्न उभे राहतात गाई आणि म्हशी यापासून चांगल्या प्रकारचे शेणखत मिळते. आजही आपण रासायनिक खते मलमुत्रापासून तयार झालेला संेद्रीय खत वापरणे अतिशय गरजेचे आहे.

**आहाराविषयी विचार -**

महात्मा गांधीनी आहाराच्या बाबतीतही आपले मौलीक विचार मांडत असताना म्हणतात की, खेड्यातील लोकांच्या आहारात पोष्टीकतेचा अभाव आहे. त्यामुळे सोयाबीन, चरबी विरहीत दुधाची पुढ आणि भाज्या यांचा आहारात समावेश असावा. आपल्या आहारामध्ये हिरवा भाजीपाला टॉमेटो, कवठाची भाजी पोषक असतात. तसेच खोबर, चिंच हेही पोषक असल्याचे म्हणतात.

**समारोप -**

गांधीजीनी खेड्याची पुनर्रचना करुन खेड्यातील लोकांना सर्वसुखसंपन्न ठेवण्याच्या संदर्भात चांगले विचार मांडले आहेत. गावामध्ये लोकांना सकस आहार, रोगमुक्त गाव, स्वच्छता, भेसळमुक्त जीवन, ग्रामस्वच्छता इ. सामाजिक दृष्ट्या समानता आर्थिकदृष्ट्या स्वयंपुर्ण गाव, स्वावलंबी गाव ई. विषयी महात्मा गांधीनी आपले विचार मांडले आहेत.

**संदर्भ -**

| | | |
|---|---|---|
| १ हरिजन | भाग ४ | ४-४-१९३६ |
| Speeches and writing of Mahatma Gandhi | ४ th edition | १९१६ |
| Harijan | vol VIII | १९४० |
| Gleanings १९३९ | | |
| Young India | | |
| हिंद स्वराज (गुजराती अवृत्ती ५६) | Vol XI | १९२९ |
| गांधी विचार दर्शन (ग्रामस्वराज्य संपादन भाऊ धर्माधिकारी) | | |